मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मावळात चालवणार फक्त 'धनुष्यबाण'

## मावळच्या विकासासाठी एकत्र राहण्याचा महायुतीच्या मेळाव्यात संकल्प

**पिंपरी | प्रतिनिधी**

महायुतीच्या नेत्यांनी मावळ तालुक्याच्या विकासासाठी वेळोवेळी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे त्यांचा शब्द आमच्यासाठी प्रमाण आहे. त्यांच्या आदेशानुसार एकजुटीने व एकदिलाने फक्त 'धनुष्यबाण' चिन्ह चालविण्यात येईल, असा निर्वाळा मावळ तालुक्यातील महायुतीच्या सर्व घटक पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी काल (मंगळवारी) दिला. तर, माझ्यापेक्षाही बारणे यांना जास्त मताधिक्य मिळेल असा विश्वास आमदार सुनील शेळके यांनी व्यक्त केला.

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी कामशेत जवळ हिरकणी लॉन्स येथे महायुतीच्या कार्यकर्त्यांचा पहिला मेळावा झाला. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात झालेल्या या मेळाव्यात एकमेकांवर मिश्किल शेरेबाजी करत महायुतीच्या तालुक्यातील सर्व नेत्यांनी खासदार बारणे यांना एकमुखी पाठिंबा जाहीर केला.

मेळाव्यास खासदार बारणे, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, आमदार सुनील शेळके, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे, माजी तालुकाध्यक्ष बबनराव भेगडे, पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाचे माजी अध्यक्ष बाळासाहेब नेवाळे, रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, भाजप विधानसभा प्रमुख रवींद्र भेगडे, प्रभारी भास्करराव म्हाळसकर, भाजपचे तालुकाध्यक्ष भाऊ गुंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजू खांडभोर, मनसेचे तालुकाध्यक्ष रुपेश म्हाळसकर, आरपीआयचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर भालेकर, भाजपा महिला आघाडीच्या तालुक्याध्यक्ष सायली बोत्रे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष दीपाली गराडे, शिवसेना महिला संघटक शैला पाचपुते आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



### आमदार सुनील शेळके यांची टोलेबाजी

आमदार सुनील शेळके यांनी त्यांच्या खास शैलीत टोलेबाजी करत सभा गाजवली. गेल्या पाच वर्षात जेवढी राजकीय स्थित्यंतरे अनुभवली तेवढी इतरांनी 50 वर्षांत अनुभवली नसतील, असे सांगत ते म्हणाले की, अनेक नाट्यपूर्ण राजकीय उलथापालथी झाल्याने कधी विरोधात, कधी सत्तेत, कधी बरोबर, कधी बाजूला अशा वेळोवेळी भूमिका बदलाव्या लागल्या. हे सर्व करीत असताना मावळचा विकास या एकाच मुद्द्यासाठी आम्ही तडजोडी केल्या. मानापमान सहन केला. तालुक्याला न्याय देईल, विकास करेल त्यालाच पाठिंबा, एवढीच आपली भूमिका असते.

तालुक्याला दोन-अडीच हजार कोटी रुपयांचा निधी देणाऱ्या नेत्याशी इमान राखणे आवश्यक आहे. अजितदादांचा शब्द आमच्यासाठी अंतिम आहे. त्यामुळे मावळात बारणे यांना आपल्यापेक्षाही अधिक मताधिक्य मिळेल, अशी ग्वाही आमदार शेळके यांनी दिली. बारणे यांनी गेल्या दहा वर्षात केलेल्या कामाचा लेखाजोखा द्यावा एवढीच माझी मागणी होती, त्याप्रमाणे त्यांनी तो दिला आहे. त्यामुळे आता कोणतीही तक्रार उरलेली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# राम जन्मला गं सखी..राम जन्मला..!

## माध्यान्हीच्या प्रहरी सुवासिनींनी पाळणा हलविला : समूहस्वरांत पाळणा गात रामजन्म सोहळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

कानावर पडणारे 'गीतरामायणा'चे कीर्तनाचे सूर.. दवण्याचा दरवळणारा सुगंध.. उन्हाच्या तपत्या झळा असतानाही येणारी वाऱ्याची हलकीशी झुळूक.. रामजन्माचे रंगलेले आख्यान.. माध्यान्हीच्या प्रहरी सुवासिनींनी पाळणा हलविला आणि समूहस्वरांत पाळणा गात रामजन्म सोहळा पारंपरिक उत्साहात बुधवारी मोशीतील नागेश्वर महाराज मंदीरात साजरा झाला. सुंठवडा आणि रामाच्या पागोट्याचे सूत हा प्रसाद घेण्यासाठी भाविकांची झुंबड उडाली होती.

चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवव्या तिथीला रामनवमी साजरी केली जाते आणि हा सण भगवान रामाची जयंती म्हणून देशभरात मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. अयोध्येत राममंदिराच्या उभारणीनंतरची पहिली रामनवमी कीर्तन, भजन, होमहवन, प्रवचन, पाळना, महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. जय श्रीराम, श्रीरामचंद्र की जय अशा घोषणा देत तरुणाईने संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता.



### श्रीरामाचा जयघोष...

श्रीरामाचा जयघोष झाला अन् 'राम जन्मला गं सखी, राम जन्मला', 'सियावर रामचंद्र की जय... पवनसुत हनुमान की जय... प्रभू रामचंद्र भगवान की जय'... अशा जयघोषाने मोशी परिसर दुमदुमदून गेला. कीर्तन, भजन आणि श्रीरामाच्या नामस्मरणाने मंदिरातील वातावरण भारावले होते. रामनवमीनिमित्त ह.भ.प बबन महाराज म्हस्के यांच्या किर्तनाची सेवा घडली. अबालवृद्धांनी या श्रीराम जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभाग घेतला. समस्थ मोशी ग्रामस्थांच्या वतीने या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

# आचारसंहिता भंगाच्या तब्बल 500 तक्रारी

## 10 जणांविरोधात आचारसंहिता भंगाची कारवाई : जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असून प्रचारासाठी राजकीय पक्ष, उमेदवार तसेच त्रयस्थ व्यक्तींकडून समाजमाध्यमांचा वापर होत आहे. त्यात निवडणूकविषयक नियमांचे काटेकोर पालन व्हावे याकडे लक्ष दिले जात आहे. आचारसंहिता नियमभंग केल्याच्या तब्बल ५०० तक्रारी आल्या आहेत. त्यापैकी १० जणांविरोधात आचारसंहिता भंगाची कारवाई केली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे.

जिल्हाधिकारी म्हणाले, समाजमाध्यमांद्वारे होणाऱ्या निवडणूक प्रचारावर निवडणुकीसाठी कार्यान्वित जिल्हास्तरीय माध्यम सनियंत्रण कक्षाचे बारकाईने लक्ष असून नियमांचा भंग आढळून आल्यास कारवाईला सुरुवात केली आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स, यूट्यूब या समाजमाध्यमांचा निवडणूक प्रचारासाठी अवलंब केला जातो. असे करताना आचारसंहितेच्या काळात निवडणूक प्रक्रियेला बाधा येईल अशा प्रकारची कोणतीही पोस्ट नागरिकांनी समाजमाध्यमांवरून करू नये. आचारसंहितेच्या काळात फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स आदी समाजमाध्यमांवरून आक्षेपार्ह पोस्ट, तथ्यहीन माहिती पसरवणे, निवडणूक प्रक्रियेत बाधा निर्माण करण्याच्या गैरप्रकारांवरही माध्यम सनियंत्रण कक्षाकडून लक्ष ठेवण्यात येत आहे.

उमेदवार, राजकीय पक्षांना तसेच त्रयस्थ व्यक्तींना प्रचाराच्या जाहिराती दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल वाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हाईस मेसेजेस तसेच सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळावरून प्रसिद्ध करावयाच्या असल्यास या जाहिराती जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जिल्हा आणि राज्य स्तरावर जाहिरात परवानगीसाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रमाणीकरण करून न घेता जाहिरात प्रसारित किंवा पोस्ट केल्यास निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येणार आहे.



समाजमाध्यमाद्वारे राजकीय मजकूर, संदेश, छायाचित्र किंवा व्हीडीओ पोस्ट करण्यास पूर्व परवानगीची आवश्यकता नाही. तथापि समाजमाध्यमांवर राजकीय जाहिराती पोस्ट केल्यास त्यासाठी पूर्वप्रमाणीकरण आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस अगोदरचा कालावधी वगळता वृत्तपत्रातील राजकीय जाहिरातींसाठी इतरवेळी प्रमाणीकरणाची आवश्यकता नाही. तथापि ती जाहिरात ई-वृत्तपत्रात प्रकाशित होणार असल्यास त्यास पूर्व प्रमाणीकरण आवश्यक राहणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### निवडणूक ड्यूटी रद्द करा, कर्मचाऱ्यांची मागणी

लोकसभा निवडणुकीसाठी जवळपास ४ लोकसभा मतदारसंघांचे मिळून ८५०० हून जास्त पोलिंग बूथ आहेत. त्यासाठी ७१,००० अधिकारी आणि कर्मचारी लागणार आहेत. यामध्ये निवडणूक आयोगाच्या निकषांनुसार अर्ज मंजूर केले जातील. एकूण ३५०० अर्ज आले असून त्यातील काही अर्ज मंजूर केले जातील. जे ५००० कर्मचारी इलेक्शन ड्यूटीवर हजर झालेले नाहीत, त्यांच्या विरोधात कडक कारवाई केली जाईल, असं जिल्हाधिकारी डॉ. दिवसे म्हणाले.

# महाविकास आघाडीचे उद्या शक्तिप्रदर्शन

## महाविकास आघाडीचे तीन उमेदवार अर्ज भरणार : उमेदवारांसाठी सभा होणार

**पुणे | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुप्रिया सुळे, शिरूरचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे आणि पुण्यातील उमेदवार रवींद्र धंगेकर गुरुवारी (१८ एप्रिल) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यानिमित्ताने महाविकास आघाडीच्या वतीने शक्तिप्रदर्शन करण्यात येणार असून शरद पवार यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी सभा होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी साडेदहा वाजता हे तिघे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यानंतर रास्ता पेठ येथील हॉटेल शांताईसमोर महाविकास आघाडीची सभा होणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली. या सभेच्या निमित्ताने ज्येष्ठ नेते शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, आम आदमी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अजित फाटके सभेला मार्गदर्शन करणार आहेत. महाविकास आघाडी लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकणार आहे. विशेष म्हणजे बारामतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार गुरुवारीच उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

पुणे आणि शिरूर लोकसभेसाठी येत्या १३ मे रोजी तर बारामतीसाठी ७ मे ला मतदान होणार आहे. महाविकास आघाडीकडून या तिन्ही लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांकडून प्रचार सुरू झाला आहे. वैयक्तिक भेटीगाठी, नागरिकांबरोबर संवाद, पदयात्रांनी मतदारसंघातील वातावरण ढवळून निघण्यास सुरूवात झाली आहे. त्यातच आता नेत्यांच्या सभांमुळे वातावरण तापणार असून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी उडण्यास सुरुवात होणार आहे. शरद पवार, संजय राऊत या सभेच्या निमित्ताने काय बोलणार, याबाबतही महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, प्रचाराचे रणशिंग फुंकल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर सभा घेण्याचे नियोजनही महाविकास आघाडीकडून करण्यात आल्याचे काँग्रेसचे निवडणूक प्रचार प्रमुख मोहन जोशी यांनी सांगितले.



### धंगेकर, मोहोळ यांच्या प्रचाराला वेग

महाविकास आघाडीचे पुण्यातील उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचाराने वेग घेतला आहे. धंगेकर यांनी मंगळवारी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यान आणि शहीद मेजर ताथवडे उद्यानात आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. काही ज्येष्ठ आणि प्रतिष्ठित नागरिकांबरोबर धंगेकर यांनी चर्चा केली. दरम्यान, मोहोळ यांनी येरवडा भागातील गाडीतळ चित्र चौकात पदयात्रा काढत नागरिकांशी संवाद साधला. पदयात्रेचा समारोप लक्ष्मीनगर पोलीस चौक परिसरात झाला. उपनगरातील प्रचारावर मोहोळ यांनी भर दिला आहे.

# जीवितहानीस फलकधारक जबाबदार

## फलक स्ट्रक्चर तपासून घ्या :महापालिका प्रशासनाची फलकधारकांना



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानपालिका हद्दीमध्ये असणाऱ्या सर्व जाहिरात फलक धारकांनी उभारण्यात आलेल्या फलकांचे स्ट्रॅक्चर मजबूत आहे याची खातर जमा करणे गरजेचे आहे. जर स्ट्रॅक्चर कमकुवत असेल तर ते त्वरित हटविण्यात यावे.

“शहरातील सर्व जाहिरात फलकधारकांनी आपल्या फलकांचे स्ट्रक्चर मजबूत असल्याची खात्री करावी. कमकुवत स्ट्रक्चर त्वरित हटवावे. वादळ, वाऱ्यामुळे फलक पडून जिवित वा वित्तहानी झाल्यास जाहिरात फलकधारक जबाबदार राहील,” असा इशारा महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिला.

गेल्या काही वर्षांमध्ये उन्हाळ्यात होणाऱ्या अवकाळी वादळ वाऱ्याच्या पावसात फलक कोसळून जीवित हानी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यामुळे पालिकेने फलकधारकांना सूचना केल्या आहेत. वादळ, वारा किंवा जोरदार पावसाने स्ट्रॅक्चर पडून जीवित किंवा वित्त हानी झाल्यास त्यास जाहिरात फलक धारकास जबाबदार धरण्यात येईल, असा इशारा महापालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी जाहिरात फलक धारकांनी जाहिरात फलक मंजूर करुन उभारले आहेत. पावसाळ्याच्या सुरुवातीला आणि उन्हाळ्यात अवकाळी पावसाच्या वेळी वादळ, वारा मोठ्या प्रमाणावर येत असतो. अशा प्रकारच्या वादळवाऱ्याने कुजलेली, गंजलेली, कमकुवत,

अशा प्रकारचे जाहिरात फलकांचे स्ट्रक्चर पडुन जीवितहानी किंवा वित्तहानी होण्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. या घटना टाळण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना राबविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे मंगळवारी (दि.16) बैठक पार पडली.

या बैठकीस सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उपायुक्त संदीप खोत तसेच संबंधित विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील काही जाहिरात फलक हे महापालिका परवानगीकरीता प्रलंबित आहेत. ही बाब उच्च न्यायालयात सादर करण्यात आली आहे. तसेच सर्व जाहिरात फलकांची सादर केलेली स्ट्रक्चर स्टॅबिलिटी पुन्हा सन 2024-25 एप्रिलअखेरपर्यंत तपासून घेण्याबाबत सूचना बैठकीत देण्यात आल्या.

अनेकदा मंजूर केलेल्या फलकांचे नुतनीकरण करताना स्ट्रक्चर स्टॅबिलिटी सादर केलेले असले तरीही अपघात घडल्याचे निदर्शनास आले आहे. अनेकदा जीवित आणि वित्त हानी होण्याची शक्यता असते. अनेकदा जीवित आणि वित्त हानी होण्याची शक्यता असते. हा विषय गंभीर असून याबाबत महापालिकेने कडक पाऊले उचलण्यास सुरुवात केली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### प्रमाणपत्र देणारा अभियंता जबाबदार असणार

» स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी प्रमाणपत्र आकाशचिन्ह व परवाना विभागास सादर करणे बंधनकारक असणार आहे. जाहिरात फलकांना ज्या संरचना अभियंत्याने प्रमाणपत्र दिलेले आहे, त्यापैकी एखादे जाहिरात फलक कमकुवत आढळले किंवा फलक पडून काही जिवित अथवा वित्तहानी झाल्यास संबंधित संरचना अभियंतास जबाबदार धरण्यात येणार आहे.याबाबत आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपाययोजना आखण्यात येत आहेत, अशी माहिती आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त संदीप खोत यांनी दिली.

---

# नागरिकांवर भार : खासगी टँकरचे पाणी महागले

## दरमहा कोट्यवधी रुपयांची उलाढाल, वॉटर टँकर संघटनेकडून दरवाढ लागू

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाचा तडाखा वाढत असतानाच शहरातील मुख्य भागासह उपनगरामधील पाणीपुरवठ्यावर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. परिणामी शहरातील अनेक सोसायट्यांना विकतचे पाणी घ्यावी लागत असून, दरमहा लाखो रुपये मोजावे लागत आहेत. कृत्रिम पाणीटचाई करून टँकर लॉबीला पोसले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. लोकसभेबरोबरच आगामी कालातील विधानसभा व महापालिका निवडणुकीत या कृत्रिम पाणीटंचाईचे परिणाम दिसण्याची शक्यता आहे.

शहरातील वाकड, चऱ्होली, मोशी, डुडुळगाव, रावेत या भागात मोठे नागरीकरण झाले आहे. शेकडो सोसायट्यांनी या परिसर व्यापला आहे. मात्र, या सोसायट्यांना आजपर्यंत पुरेसा पाणीपुरवठा करण्यात महापालिका प्रशासन कायम अपयशी ठरलेले आहे. बांधकाम व्यावसायिकांना अटीशर्तीसह प्रकल्प पूर्णत्वाचा दाखल दिल्यानंतर आता सोसायटीधारकांना वॉटर टँकरवर अवलंबून रहावे लागत आहे. याचा मोठा फटका सोसायटीधारकांना बसत आहे. पाण्यासाठी लाखो रुपये मोजावे लागत आहे.

शहरातील सर्वात वेगाने नागरीकरण होणारा परिसर अशी वाकड, रावेत, चऱ्होली, डुडळगाव, मोशी व परिसराची ख्याती आहे. याठिकाणी बांधकाम व्यावसायिकांनी गगनचुंबी इमारती उभारल्या आहेत. मात्र, या भागात होणारा पाणपुरवठा अपुरा असल्याने, पाण्याची तूट भरुन




काढण्यासाठी सोसायटीधारकांना खासगी टँकरकडून विकतचे पाणी घेण्याशिवाय पर्याय नाही.

त्यामुळे अगदी पावसाळ्यातही याठिकाणच्या सोसायट्यांमध्ये खासगी वॉटर टँकरच्या खेपा सुरू असतात. हातात खुळखुळणाऱ्या पाण्याच्या पैशाने राजकीय व्यक्तींशी सलगी ठेवणाऱ्या अनेकांचे टँकर आता सोसायट्यांमध्ये रिकामे होत आहेत. तर राजकीय पाठबळाने वॉटर टँकर लॉबी चांगली गब्बर झाली आहे. तर सोसायटीधारकांना याची किंमत चुकवावी लागत आहे.

**अशी आहे दरवाढ लिटर क्षमता नवीन दर**

6 हजार लिटर 700 रुपये
10 हजार लिटर 1200 रुपये
25 हजार लिटर 3000 रुपये
30 हजार लिटर 3600 रुपये
35 हजार लिटर 4200 रुपये

**कमी दरात टँकर दिल्यास कारवाई**

वॉटर टँकर संघटनेच्या वतीने केली दरवाढ या भागातील सर्व टँकर चालकांना लागू करण्यात आली आहे. त्यामुळे नव्या दरानुसार पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. सुधारित दरवाढीनुसार पाणीपुरवठा न करणाऱ्या वॉटर टँकर चालकांना 25 हजार रुपये दंड केला जाणार आहे.

**ही आहेत दरवाढीची कारणे**

वॉटर टँकरच्या दरवाढीची अनेक कारणे संघटनेने दिली आहेत. त्यामध्ये डिझेलच्या दरातील वाढ, वाहनांचा देखभाल दुरुस्तीचा खर्च , वाहन विमा, आरटीओ कर अशा विविध बाबींचा उल्लेख करत, दरवाढीचे समर्थन कले आहे.

### मेन्टेनन्समध्ये वाढ

» सोसायटीतील प्रत्येक फ्लॅटला पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सोसायटीच्या पधाधिकाऱ्यांन तारेवरची कसरत करावी लागत आहे. खासगी वॉटर टँकरचे दरमहा लाखो रुपये बिल मोजणाऱ्या अनेक सोसायट्या शहरात आहेत. तर महापालिकेपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या सोसासयट्यादेखील पाणीटंचाईच्या झळांपासून वाचू शकलेल्या नाहीत. याचा थेट परिणाम दरमहा आकारल्या जाणाऱ्या देखभाल दुरुस्तीच्या रकमेत होत असल्याने, त्याचा आर्थिक भुर्दंड सोसायटीतील नागरिकांनाच सोसावा लागत आहे.

# वाघेरेंचा पुन्हा एकदा बारणेंवर निशाणा

## मला पिंपरी- चिंचवड शहरामध्ये सर्वजण ओळखतात : माझं अवघं कुटुंब राजकारणी

**पुणे | प्रतिनिधी**

बारणेंना कुणीतरी सांगा माझं अवघं कुटुंब राजकारणी आहे. मला पिंपरी- चिंचवड शहरामध्ये सर्वजण ओळखतात. तरी देखील ते मान्य करत नसतील तर बारणेंनी अभ्यास करावा. मगच माझ्यावर बोलावं असं सडेतोड प्रतिउत्तर महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांना दिलं आहे. संजोग वाघेरे हे पत्रकार परिषदेत बोलत होते.



महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी विरोधकांना पराभव दिसत असल्याने अशी वक्तव्य करत आहेत, अशी टीका केली होती. तसंच बारणे यांनी विरोधी उमेदवाराला ओळखत नाही, असं विधान केलं होतं. यावर पुन्हा एकदा संजोग वाघेरे यांनी श्रीरंग बारणेंवर निशाणा साधत प्रतिउत्तर दिलं आहे. वाघेरे म्हणाले, बारणेंना सांगा, माझी पत्नी तीन वेळा निवडून आलेली आहे. मी महापौर होतो, माझे वडील महापौर होते. या गावचे ते सरपंच ही होते. हे सर्व बघता बारणेंचा अभ्यास कमी आहे. असं वाटतंय. त्यांनी अगोदर अभ्यास करावा आणि मग बोलावं. अस प्रतिउत्तर वाघेरे यांनी बारणेंना दिलं आहे. यावर आता महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे हे काय उत्तर देतात हे बघावं लागेल. दिवसेंदिवस वाघेरे आणि बारणे यांच्यामध्ये आरोप- प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. परंतु, दोघांपैकी खासदार म्हणून कोणाला मावळची जनता निवडून देणार हे येणारा काळ ठरवेल.

लोकसभा निवडणुकीमुळे राज्याचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सर्व मतदारसंघांतील प्रतिस्पर्धी उमेदवार एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. काही ठिकाणी उणी-दुणी काढत, इतिहास उगळत चिखलफेकही केली जात आहे. अशा वातावरणात मात्र मावळचे खासदार श्रीरंग बारणेंनी माझ्या विरोधात कोण आहे, हे मला माहीत नाही, असा टोला महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरेंना लगावला होता. यावर वाघेरेंनी बारणेंना रावणाची उपमा देत सडेतोड प्रत्युत्तर दिले. परिणामी मावळातील उभय उमेदवारांत चांगलाच कलगीतुरा रंगल्याचे दिसून येत आहे.

श्रीरंग बारणे यांनी दोन वेळा आपला मतदारसंघ राखला आहे. गेल्यावेळी त्यांनी तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार पार्थ पवारांचा मोठ्या फरकाने पराभव केला होता. आता बदलेल्या राजकीय स्थितीत यंदा उपमुख्यमंत्री अजित पवारच बारणेंच्या प्रचारासाठी उतरले आहेत. त्यांच्याविरोधात पूर्वाश्रमीचे अजितदादांचे शिलेदार आणि ठाकरे गटात गेलेले संजोग वाघेरेंना आव्हान उभे केले आहे. तर महाविकास आघाडीचे उमेदवार हे ठाकरे गटाचे संजोग वाघेरे आहेत. मावळात दोन्ही नेत्यांनी प्रचाराची राळ उठवली आहे.

### रावणाची उपमा देत निशाणा

» संजोग वाघेरे मावळच्या तळेगावमध्ये आले असता गावभेटीदरम्यान बोलत होते. या वेळी वाघेरे म्हणाले, श्रीरंग बारणेंचा अहंकार वाढला आहे. त्यांनी मात्र लक्षात ठेवले पाहिजे, की या देशात रावणाचा अहंकार टिकला नाही, तर आपण कोण? येत्या 13 तारखेला त्यांच्या अहंकाराचा मतदारच अंत करेल, अशी जहरी टीका केली आहे. बारणे आणि वाघेरे यांच्या आरोप - प्रत्यारोपांनी मावळचे वातावरण ढवळून निघाले आहे.

# 45 गावांतील 65 हजार ग्राहक उकाड्याने त्रस्त

## टॉवर लाइनची तार तुटली, एन उन्हाळ्यात महावितरणचा खेळ सुरुच

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाची काहीली वाढली असून तापमानाचा पारा ४०च्या पुढे गेला आहे. परिणामी नागरिक त्रस्त झाले असतानाच महापारेषणच्या वाहिन्यांमध्ये विविध कारणांनी बिघाड होत असून वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे अधीच उकाड्याने त्रस्त झालेल्या ग्राहकांना महावितरण वीजपुरवठा खंडित करून झटके देत आहे.

महापारेषणची एक वाहिनी तुटल्याने भुकूम, भूगाव, पिरंगुट, कोळवण खोरे, मुठा खोरे आदी मुळशी परिसरातील ४५ गावांतील सुमारे ६५ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता.

महापारेषण कंपनीच्या २२० केव्ही टॉवर लाइनची दोन पैकी एक वीजवाहिनी तुटल्याने पिरंगुट २२० केव्ही व हिंजवडी २२० केव्ही उपकेंद्रांचा व पर्यायाने महावितरणच्या २० वाहिन्यांचा वीजपुरवठा मंगळवारी (दि. १६) सकाळी ९.१० वाजता बंद पडला. परिणामी ४५ गावांतील सुमारे ६५ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता, अशी माहिती महापारेषणकडून देण्यात आली.

कोकणातील रोहा येथून महापारेषणच्या कांदळगाव २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्रातून टॉवर लाइनद्वारे पिंरगुट व हिंजवडी येथील महापारेषणच्या २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्राला वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र, कांदळगाव २२० केव्ही टॉवर लाइनची एक वीजवाहिनी आंबेगाव (ता. मुळशी) येथे मंगळवारी (दि. १६) सकाळी ९.१० वाजताच्या सुमारास तुटली.



त्यामुळे पिरंगुट व हिंजवडी अतिउच्चदाब उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद पडला. त्यामुळे मुळशी तालुक्यातील भूगाव, भूकूम पिरंगूट, बुरावडे, कोळवण खोरे, मुठा खोरे, पौड, माले, माण, मारूंजी, कासारसाई, नेरे, दत्तवाडी, हिंजवडीचा काही भागांसह ४५ गावांतील सुमारे ६५ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. महापारेषणची अतिउच्चदाब वीजवाहिनी तुटल्याने ७० मेगावॅट विजेची पारेषण तूट निर्माण झाली आहे.

### सहा तासांनी वीजपुरवठा सुरळीत

सकाळी ९.१० वाजता खंडित झालेल्या वीजपुरवठ्याची युद्धपातळीवर पर्यायी व्यवस्था करून दुपारी १२.५ ते ३.३६ वाजेपर्यंत टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आला. सध्या तापलेल्या उन्हामुळे नागरिक त्रस्त झालेत विजेची मागणी वाढल्याने ७० मेगावॅट विजेचे भारव्यवस्थापन करणे आव्हानात्मक होत आहे.

दरम्यान, महापारेषणकडून तुटलेल्या अतिउच्चदाब वीज वाहिनीच्या दुरूस्ती कामाला वेग देण्यात आला व दुपारी ३.२५ वाजता तुटलेल्या वीजवाहिनीचे दुरुस्ती काम पूर्ण झाले. त्यानंतर महापारेषणची कांदळगाव २२० केव्ही अतिउच्चदाब वीजवाहिनी कार्यान्वित करण्यात आली. त्याद्वारे पिंरगुट व हिंजवडी येथील महापारेषणच्या २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्राचा वीजपुरवठा देखील पूर्ववत झाला.

### अपत्तीपूर्व व्यवस्थापन गरजेचे...

» महावितरणकडून पावसाळ्यापूर्वीच देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेतली जातात. दरवषी पावसाळ्यात भर उन्हाळ्यात खंडित वीजपुरवठ्याचा त्रास वीज ग्राहकांना सहन करावा लागतो. महावितरण वीजबिल भरले नाही की विद्युतपुरवठा खंडित करते. परंतु तासंतास वीजपुरवठा खंडित झाल्याने लहान मोठे व्यावसायिक व नागरिकांचे जे नुकसान होत आहे याची भरपाइ कोण करणार असा प्रश्न नागरिक करत आहेत.